# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

क्रमांक:२अ/एडीएम/फी वेव्हर/२००८/3050
दिनांक : 8 DEC 2008

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : **शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या टयूशन फी वेव्हर योजनेसंदर्भात**

संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/फी वेव्हर/२००८/१६३९, दिनांक ३०.५.२००८ अन्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या टयूशन फी वेव्हर योजनेतसहभागी झालेल्या संस्थांना खालील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

टयूशन फी वेव्हरच्या विस्तृत मार्गदर्शक सूचनांसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावरील No.37-03/Legal/2007 Dated 09.04.2007 Guidelines , शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टिईएम-२००७/(३७३/०७)/तांशि-१, दिनांक २९.८.२००८ तसेच शैक्षणिक वर्ष २००८-०९ च्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तकातील नियम क्रमांक २.१.१ आणि नियम क्रमांक ७.२ कृपया अवलोकन करून खालील सूचना अंमलात आणण्यात याव्यात.

- टयूशन फी वेव्हरकरिता लाभार्थी विद्यार्थी निश्चित करण्याचा निर्णय घेण्यासाठी या योजनेत सहभागी झालेल्या संस्थाचे प्राचार्य सक्षम प्राधिकारी असतील.
- प्राचार्यांनी प्रत्येक अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत **(एआयईईई वगळून)**प्रवेश घेतलेल्या उमेदवारांमधूनच गुणवत्ता यादीनुसार व खाली दिलेल्या तक्त्यानुसार लाभार्थींची निवड करावी.
- टयूशन फी वेव्हर योजनेत प्रवेशासाठी निवड झालेल्या उमेदवारांकडून या योजनेत स्वेच्छेने प्रवेश घेऊ इच्छित असून सदर योजनेत प्रवेश घेतल्यामुळे भविष्यात अभ्यासक्रम बदल, संस्थाबदल करणार नाही व प्रवेश घेतलेला अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत या योजनेत सहभागी असेन अशा आशयाचे हमीपत्र संस्थास्तरावर घेणे आवश्यक आहे. निवड झालेले उमेदवार सदर हमीपत्र देण्यास सहमत नसतील तर गुणवत्तेनुसार अनुक्रमाने पुढील उमेदवाराची निवड करावी. अशाच प्रकारचे हमीपत्र ज्या विद्यार्थ्यांना प्रवेशक्षमतेव्यतिरिक्त जागांवर सदर योजनेनुसार प्रवेश मिळालेला आहे अशा विद्यार्थ्यांकडूनही घेण्यात यावे.
- टयूशन फी वेव्हर योजनेत प्रवेशासाठी निवड झालेला उमेदवार अन्य कोणत्याही सवलती उदाहरणार्थ आर्थिकदृष्टया मागास उमेदवारांसाठी ५०टक्के शिक्षण शुल्कमाफी इत्यादीसाठी पात्र असणार नाही व ही बाबही संबंधितांना ठळकपणे नजेरस आणून त्याची हमी घ्यावी.
- टयूशन फी वेव्हरअंतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यास (Economical Weker Student -EWS) सदर विद्यार्थ्याच्या पालकांचे सर्व मार्गापासून मिळणारे उत्पन्न रूपये २.५०लाखाच्या मर्यादेत असल्याचे **तहसिलदार स्तरावरील अथवा त्यावरील सक्षम अधिका-यांनी** दिलेले उत्पनाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

आर्थिकदृष्टया कमकुवत गटामध्ये (EWS) गुणवत्तेनुसार महिला उमेदवाराची निवड करावयाची असल्यास सदर महिला उमेदवाराकडून उत्पनाचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

- टयूशन फी वेव्हरअंतर्गत मजूर झालेल्या जागांचे पुढील तक्त्यानुसार वाटप करण्यात यावे.

| प्रवेशित उमेदवारांची संख्या | लाभार्थी संख्या | ६० प्रवेश क्षमतेसाठी वर्गवारी | | |
|---|---|---|---|---|
| | | EWS | Ladies | PH |
| ६६ | ६ | ३ | २ | १ |
| ६५ | ५ | २ | २ | १ |
| ६४ | ४ | २ | १ | १ |
| ६३ | ३ | १ | १ | १ |
| ६२ | २ | १ | १ | ० |
| ६१ | १ | १ | ० | ० |

तसेच लाभार्थिंची संख्या (३+२+१) = ६ अशी प्रवर्गनिहाय पुरेशी नसल्यास टयूशन फी वेव्हरच्या इतर प्रवर्गातील लाभार्थिंची एकत्रित गुणवत्ता यादी तयार करुन त्यातील विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे फायदा देण्यात यावा. याबाबतची नमुना स्थिती उदाहरणादाखल पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

| | No. of desiring Candidates | | | Beneficiary | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | EWS | Girl | PH | EWS | Girl | PH |
| Ideal Case | 3 | 2 | 1 | 3 | 2 | 1 |
| Case 1 | 5 | 1 | 1 | Top 4 | 1 | 1 |
| Case 2 | 2 | 3 | 2 | 2 | 2+ 1 if Girl is of higher merit than PH | 1+1 if PH is of higher merit than Girl |
| Case 3 | 5 | 3 | 0 | 3+ 1 if EWS is of higher merit than Girl | 2+1 if Girl is of higher merit than EWS | 0 |

- टयूशन फी वेव्हर योजनेत सहभागी झालेल्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, या योजनेत सहभागी झाल्यामुळे प्रवेश क्षमता वाढली असली तरी थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता ठरविताना मंजूर प्रवेश क्षमताच विचारात घेतली जाईल. प्रवेश क्षमतेव्यतिरिक्त सदर योजनेअंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश ओव्हर अँड अबोव्ह असेल. सदर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास पुढील वर्षी त्यांच्या ऐवजी इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. तसेच लाभार्थी विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास या लाभार्थी विद्यार्थ्यांना योजनेनुसार मिळालेले प्रवेश व फायदे पुढील सर्व वर्षासाठी (अभ्यासक्रम संपेपर्यंत) देय राहतील.

- या योजनेत निवड करण्यासाठी पात्र ठरविलेल्या व त्यानंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या सूचनाफलकावर ठळकपणे निदर्शनास येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करणे अनिवार्य आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करणे ही संबंधित संस्थेच्या प्राचार्याची जबाबदारी आहे.

(डॉ.एस के महाजन)
प्र.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई